INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# प्राचीन कालखंडातील स्त्री जीवनाचा आढावा
# (A Review of Women's life in Ancient Times)

**प्रा.डॉ. बी. डी. जाधवर**

इतिहास विभाग प्रमुख,
बलभीम महाविद्यालय, बीड

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/12.2024-56882214/IRJHIS2412011**

**प्रस्तावना :-**

जगाच्या देशाच्या व राज्याच्या इतिहासात प्राची कालखंडात समाजातील स्त्रिया, पुरुष या शिवाय इतर काही महत्वाचे घटक आहेत. त्या घटकांचा किंवा व्यक्तींच्या अधिकारांचे पूर्वीचे ऐतिहासिक पैलू पडताळायचे असतील तर त्यासाठी काही ऐतिहासिक साधनांचा आधार घ्यावा लागतो. तो आधार म्हणून काही वैदिक साहित्य म्हणजे मॅक्समूलरच्या मते (वेदांना) आर्याचे बायबल असे मॅक्समूलर म्हणतो ते वैदिक साहित्य याशिवाय महाकाव्ये पूराणे, तसेच बौध्द आणि जैन धर्मांचे साहित्य स्मृती साहित्य धर्मश्रुते, कौटिल्याचे अर्थशास्त्र संस्कृत व प्रकृत साहित्य, मंदिरे लेण्या मूर्ती, परकियांची प्रवासवर्णने, पुरातणातील साधने अशा वरील विविध साधनांच्या आधारे प्राचीन इतिहासातील घटनांची पडताळणी करावी लागते. वरिल साधनांच्या आधारे प्राचीन काळातील घटनावर जे मंथन होईल ते खऱ्या अर्थाने अभ्यास पूर्ण असणार आहे, अशा घटना व व्यक्तीपैकी आपणास प्राचीन कालखंडातील स्त्री जीवनाचा आढावा याविषयी या शोध निबंधात काही गोष्टी नोंदवणे आवश्यक आहे.

प्राचीन काळात भारतात असो किंवा जगामध्ये असो समाज हा टोळी समाज म्हणून वास्तव्यास होता. तत्कालीन समाजाची जेंव्हा भटकंतीची स्थिती होती. त्या काळात मानवाच्या उपजिविकेसाठी आवश्यक असणारे अन्न गोळा करण्याचे महत्वाचे काम तत्कालीन स्त्रिया-पुरुष एकत्रपणे करत असत. प्राचीन काळात समाजाचे वास्तव्य हे टोळीच्या स्वरूपात असल्याने असे म्हटले जाते की, शेतीचा शोध सुध्दा खऱ्या अर्थाने स्त्रियानीच लावला. कारण जमिनीत असलेली कंदमुळे बाहेर काढणे, झाडाला लागलेली फळे तोडणे, शेतीची मशागत करणे, धान्याचे साठे करणे, दुग्ध व्यवसाय, पशुपालन या गोष्टी विकसित करण्यात स्त्रियांचा मोठा सहभाग होता. तरी पण पितृसत्ताक कुटूंब पध्दती अस्तीत्वात आणून गृहसत्ता-अर्थसत्ता या दोन स्त्रियांच्या हातून घेवून पुरुषी वर्चस्व त्यावर प्रस्थापीत झाले. पुढे कुटूंब प्रामुख्याने स्त्रिया व मुले यांच्यावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करून आपले अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्त्रियाचा दर्जा घसरत गेला आणि याच गोष्टी भारतात सुध्दा घडून आल्या हे आपणास मान्य करावे लागेल.

जगामध्ये अनेक वेगवेगळ्या संस्कृती अस्तीत्वात आहेत. त्या संस्कृतीचा दर्जा ठरवायचा असेल तर त्या संस्कृतीमधील स्त्रिजिवन कसे आहे हे पहाणे गरजेचे आहे. मग अनेक गोष्टीवरून स्त्रियांचा दर्जा ठरवत असतो. त्यामुळे प्राचीन काळात

स्त्रियांचा दर्जा कसा होता. हे खालील बाबींवरून स्पष्ट होतो.

**मुलीच्या जन्माने असमाधान :-**

प्राचीन कालखंडातील कुटूंब पध्दतीचा विचार केला तर आपणास पितृसत्ताक (कुटूंब पध्दती) अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावे देता येतात. त्यामुळे कुटूंबामध्ये मुलांच्या जन्माचे मोठे स्वागत केले जात असे तर मुलीच्या जन्माविषयी कुटूंबात अनूउत्कसता असल्याचे दिसून येत असे. कारण मुलगा हा कुटूंबाचे नाव पुढे चालू ठेवतो तसेच धार्मिक विधी पार पाडतो. याशिवाय कुटूंबाचे रक्षण आणि पालन पोषण करतो. असा तत्कालीन समज होता, याशिवाय त्याकालीन सत्ता स्पर्धेच्या वातावरणामुळे मुलांच्या जन्माचे स्वागत तर मुलीच्या जन्माविषयी कुटूंबामध्ये आनंद साजरा केला जात नसे. एकंदर या उदासिनतेमुळे वैदिक कालखंडात स्त्रियावर अनेक बंधने टाकली, या सर्व गोष्टींना स्त्रीचा जन्म हेच कारण समाजात रूजले गेले. त्याकाळात मुलीच्या जन्मासाठी कोणत्याही प्रकारची प्रतिज्ञा केल्याचे सुक्त दंतकथेत आढळून येत नाही.

**प्राचीन कालखंडातील स्त्री-शिक्षण :-**

प्राचीन कालखंडातील स्त्री जीवनाचा त्यांची प्रतिष्ठा तपासत असताना आपण अनेक उदाहरणे व काही पुरावे देऊन या आधारेच स्त्रियांचा दर्जा व तत्कालीन अधिकार यावर मंथन केले आहे. या आधारे असे स्पष्ट होते की, वैदिक काळात स्त्रियांना पुरुषाप्रमाणे स्वतंत्र बौध्दीक व आध्यात्मिक जिवन जगण्याचा हक्का होता. मुलाप्रमाणेच मुलींचे सुध्दा उपनयन केले जात होते. शिवाय वेदविद्या संगीत, नृत्य या बाबींचे शिक्षण पण त्यांना दिले जात असे, म्हणजे वैदिक काळात काही प्रमाणात स्त्रि-पुरुष समानता होती.

**प्रौढ विवाह पध्दतीचा स्विकार :-**

प्राचीन कालखंडात विविध वेद अस्तित्वात होते. त्यापैकी चार वेद हे महत्वाचे त्या वेदापैकी ऋग्वेदामध्ये असे नमूद केल्याचे दिसते की, प्रौढ विवाह पध्दतीस मान्यता दिलेली होती. काही वेळा अनेक तरूण मुली-मुले विविध अलंकार परिधान करून सण, उत्सव प्रसंगी हजर राहात असत. म्हणजे ऋग्वेद काळात स्त्रियांना आपला पती निवडीचा अधिकार दिलेला होता. त्यासाठी स्वकीयांच्या सहमतीची आवश्यकता नव्हती. घोषा या स्त्रीने आपला विवाह खूप उशिरा केला होता. या शिवाय महाभारतातील शकुंतला, देवयानी, सत्यवती, दमयंती, कुंती, द्रोपदी, सुभद्रा या सर्व स्त्रियांचे विवाह हे अतिशय तरूण वयात झालेले होते. कारण त्यांना जोपर्यंत योग्य वर मिळत नाही. तोपर्यंत त्या आपल्या वडिलांच्या घरीच राहणे पसंत करत होत्या. म्हणजे तत्कालीन बौध्द साहित्यात ही बालविवाहाचे वर्णन सापडत नाही. जवळपास इ.स.पूर्व ५ व्या शतकापर्यंत प्रौढ विवाहाची पध्दती अस्तित्वात होती. पण इ.स.पू. ४०० ते इ.स.पू १०० या काळात वरिल पध्दत बंद होऊन योग्य वयातच मुलीचा विवाह झाला पाहिजे असे स्मृतीकारानी नमूद केले. त्यामुळे बालविवाहाची प्रथा रूढ झाली. त्यामुळे मुलींचे विवाह वयाच्या ९ ते १० याच वर्षात केले जाऊ लागले म्हणजे बालविवाह हे एक स्त्रियांच्या स्वातंत्र्यावरील आघात मानावा लागेल.

**नियोगाची रुढ असलेली प्रथा :-**

प्राची कालखंडात स्त्रिया व पुरुष यांच्या दर्जाची दिशा ठरवण्यासाठी अनेक सुत्रकार होते. त्यापैकी वसिष्ठ व गौतम या दोन सुत्रकारांचा येथे उल्लेख आहे. या दोघांनी नियोगाचे सविस्तर नियम सांगितले आहेत. नियोग पध्दत म्हणजे समाजात वास्तव्य करणाऱ्या एखाद्या स्त्रियाच्या पतीचे निधन झाले तर त्या स्त्रिने मृत पतीच्या भावाशी किंवा भावाशिवाय जवळच्या नातेवाईकांशी विवाह करणे यालाच नियोगाची पध्दत असे म्हटले जाते. ऋग्वेदात एकाठिकाणी असे म्हटले आहे की, विधवा

स्त्री ही आपल्या दिराशी लग्न करते असे नमूद केले आहे. याशिवाय विविध पुराणात नियोग पध्दतीचा उल्लेख आहे. शांतीपूर्वाचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, एखाद्या महिलेच्या पतीचे निधन झाल्यानंतर ती विधवा महिला आपल्या लहान दिरासोबत विवाह करत असे असा उल्लेख आहे. त्याचे उदाहरण म्हणून पंडू आणि धृतराष्ट्र हे दोघे पण नियोगपुत्रच होते. याशिवाय गुप्तकाळाचा विचार केला तर रामगुप्ताची अतिशय सौंदर्यवान पत्नी ध्रुवदेवी विधवा झाल्यानंतर तिने आपला दिर चंद्रगुप्त दुसरा यांच्याशी विवाह केला होता. परंतू कालांतराने पतिव्रत कल्पनेच्या वाढीने ही पध्दत निषिध्द मानली जाऊ लागली. मनूने वरील पध्दतीचा निषेध केला असला तरी नियोग संततीच्या संदर्भात अनेक नियम सांगितल्याचे स्पष्ट होते. पण इ.स. नाच्या पहिल्या शतकानंतर ही प्रथा कायमस्वरुपी बदं पडल्याचे अनेक पुरावे आपणास मिळतात.

**प्राचीन कालखंड आणि सतीची पध्दत :-**

प्राचीन काळात समाजात जे चार वेद प्रचलीत होते. त्या वेदापैकी एक वेद म्हणजे ऋग्वेद होय. या वेदामध्ये असे नमूद केले आहे. सतीची प्रथा ही सर्वत्र नव्हती, ती फक्त राज्यकर्ता या वर्गासाठीच मर्यादीत होती. तरी पण सती जाण्याचे काही उल्लेख ऋग्वेद काळात आल्याचे दिसते. त्या मध्ये प्रामुख्याने पंडूची पत्नी माद्री सती गेली होती. रामराज्याचा इतिहास पाहिला तर आपणास सितेचा उल्लेख आढळतो. याशिवाय गांधारी, शेषा, हेमवती, जांबवती अशा अनेक स्त्रीयांनी श्रीकृष्णाच्या निधनानंतर अग्नीप्रवेश केल्याच्या नोंदी आहेत. त्याशिवाय हर्षाची आई सती गेली होती. त्याची बहिण राजश्री पण सती जाण्याच्या तयारीत होती. एकंदर राज्यकर्ता कुटूंबातील सर्वच स्त्रीया सती जात होत्या असे आपणास म्हणता येणार नाही. कारण अनेक स्त्रियांच्या पतीचे निधन झाल्यानंतर त्यांनी अगदी यशस्वीपणे राज्यकारभार केल्याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. त्यामध्ये सातवाहन राणी नागतिका, प्रभावती, गुप्ता यांचा विचार करावा लागतो. यावरून असे म्हणता येते की, प्राचीन कालखंडात सती हा नियम नसून अपवाद होता. त्यामध्येच मनूने पण स्पष्ट केले होते की, स्त्रियानी पती निधनानंतर सती न जाता ब्राम्हचार्याचे पालन करावे आणि जिवन जगत राहावे असे सांगितले. पण अनेक शास्त्रकारांना मात्र हे मान्यच नव्हते. शंक, अंगीरस व हरित यांनी विधवेने सती गेलेच पाहिजे असा आग्रह होता.

**प्राचीन कालीन स्त्रिया व स्वयंवर पध्दती :-**

प्राचीन मध्यमयुगीन आणि आधुनिक कालखंडात घडलेल्या अनेक घटनांचा पुरावा म्हणून अनेक इतिहासकार समाज प्रबोधनकार, लेखक यांनी वेगवेगळे ग्रंथ रेखाटले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने रामायण, महाभारत यांचा उल्लेख करावा लागेल. रामायण आणि महाभारत हे इतिहास नाही पण फार प्राचीन दंतकथा आहेत. यामध्ये इंदूमती, सीता, द्रौपदी, दमयंती यांच्या स्वयंवराच्या कथा अतिशय विस्ताराने या वरील ग्रंथात रेखाटलेल्या आहेत. अशा स्वयंवराच्या माध्यमातून अनेक पुरुषातून (राजपुत्रातून) आपला पती निवडण्याचा अधिकार स्त्रियांना होता. काही तरी शर्यत (पण) लावायचा आणि पती निवडण्याची प्रथा होती. परंतू ही प्रथा फक्त राजन वर्गापूरतीच मर्यादीत असावी असे दिसते. राजवैभवातील स्त्रिया आपणास आवडलेल्या पुरूषाशी लग्न करण्यासाठी देवांना देखील कसे झिडकारून लावतात हे आपणास दमयंतीच्या कथेचे वाचन केल्यानंतर लक्षात येते. एकंदर ग्रीक ग्रंथकारांनी या प्रथेचा येथे उल्लेख केल्याचे दिसते.

**प्राचीन स्त्रिया व प्रशासन :-**

पूर्वीच्या काळात अनेक धर्मसुधारक सर्व जगात व देशात होऊन गेले होते. प्रत्येक धर्मसुधारकांने आपल्या सोईनुसार स्त्रियावर अनेक निर्बंध लादले होते. एवढे निर्बंध असून ही अनेक कर्तबगार स्त्रिया पुढे आलेल्या होत्या. त्यामध्ये आयोध्याचा

राजा दशरथ त्याची पत्नी कैकयी हिने दशरथास युध्दात मदत करून वरप्राप्ती करून घेतली होती. तसेच द्रोपदी ही पांडवाशी सातत्याने सल्लामसलत करत असे. तर नरकासुराच्या वधात सत्यभामेने श्रीकृष्णाला मोठ्या प्रमाणात मदत केलेली होती. याशिवाय सातवहान सम्राट गौतमीपुत्र सातकणी याची बलश्री सातकर्णी ही आई होती. तिने शकांच्या संकटातून महाराष्ट्राला मुक्त करण्याचे मोठे काम केले होते. त्याचे सर्व श्रेय बलश्री सातकर्णीला जाते असे अनेक विदवनानी स्पष्ट केले आहे. मिराशी नावाच्या विदवानाने बलश्री सातकर्णी व गौतमीपुत्र सातकर्णी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्याशी केलेली आहे. नाशिक येथील सातवहान लेण्यामध्ये आपल्या मुलाच्या गौरवाचा लेख बलश्री सातकर्णीनेच कोरल्याचे पुरावे इतिहासात मिळतात.

**प्राचीन काळातील स्त्रि व नृत्य गायन चित्रकला :-**

वैदिक काळानंतरच्या कालखंडातही स्त्रीया नृत्य, गायन, चित्रकला यांचा अभ्यास करता होत्या. याच्या नोंदी सापडतात. त्याचे उदा. सम्राट हर्षवर्धनाची बहिण राजश्री ही नृत्यगायन कलात तरबेज होती. शकुंतलेची सखी अनुसया हिने चित्रकलेचा अभ्यास केला होता. या शिवाय तिला इतिहासाचे पण खूप ज्ञान होते. रत्नावली सागरिका आपल्या पित्याचे चित्र अगदी हुबेहुब काढते. मालती माधव मधील मालती ही वरील प्रमाणेच चित्र रेखाटत होती. हर्षवर्धनाचा प्रियदर्शिका या ग्रंथात तरूण-तरूणींनी गायन, वादन, नृत्य यांचा खूप अभ्यास करावा असे सांगितले आहे. गाथा सप्तसईतील अनेक गाथा स्त्रियांनी रचल्याचे स्पष्ट होते.

वरिल वेगवेगळ्या घटना आणि संदर्भाच्या अनुषंगाने प्राचीन कालखंडातील स्त्रीया व त्यांचे अधिकार किंवा जीवन याविषयीचे मंथन करण्यात आलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

१. मोरवंचीकर आर.एस.- सातवाहनकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद.
२. जोशी लक्ष्मणशास्त्री (तर्कतिर्थ) वैदिक संस्कृतीचा विकास.
३. माटे म.श्री.- प्राचीन भारतीय कला.
४. डॉ. देव प्रभाकर- प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती.
५. भिडे/कदम/खरवंडीकर, लोखंडे- प्राचीन भारतीय राजकीय व धार्मिक संस्था.